मा.जिल्हाधिकारी धुळे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०९.०३.२०११ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेचे इतिवृत्त ( स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय धुळे )

सभेस उपस्थित असलेल्या सन्माननिय सदस्यांची यादी सोबत जोडली आहे.

प्रथम सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक जिउकें धुळे यांनी मा.अध्यक्ष यांचे व उपस्थितांचे स्वागत करुन .त्यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली. सभेत खालील प्रमाणे विषय निहाय चर्चा झाली.

| अ. क्र. | विषय | अनुपालन | |
|---|---|---|---|
| १ | मागील सभा दिनांक १०.०१.२०१० रोजी झालेल्या झुम सभेचे इतिवृत्त मंजुर करणे | मागील दि.१०.०१.२०११ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त पत्र क्र. २३९ ते २८७ दिनांक १७.०१.२०११ नुसार सर्व सदस्यांना पाठविण्यांत आलेले असुन इतिवृत्तावर कोणाचाही वेगळा अभिप्राय नसल्याने सर्वानुमते मान्यता देण्यांत आली. | |
| २ | मागील सभेच्या इतिवृत्तानुसार प्रलंबित असलेल्या मुद्यांचा आढावा घेणेबाबत | | |
| १ | धुळे मऔविम क्षेत्रातील मुलभुत सुविधा – पाणी, रस्ते, पथदिवे इ. बाबत - सर्व औ.संघटना | नविन उच्चस्तरीय जलकुंभ बांधण्याचा रु. १ कोटीचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेच्या अंतिम टप्प्यात आहे. तसेच अस्तित्वातील एसी प्रेशर जलवाहिन्या बदलविण्याच्या कामाच्या निविदा उघडण्यात आलेल्या असुन मंजुरीकरीता वरीष्ठ कार्यालयात पाठविण्यात आलेल्या आहेत. मंजुरी प्राप्त होताच कार्यादेश देण्यात येवुन सदर बाब पुर्ण करुन घेण्यात येईल. तसेच रस्ते दुरुस्ती व पथदिवे दुरुस्तीचे वार्षिक देखभाल व दुरुस्तीचे कामे लवकरच निविदा मागविण्यात येवुन सुरु करण्यात येतील असे कार्यकारी अभियंता, म.औ.वि.म. विभाग, धुळे यांनी सांगितले. मुलभुत सुविधांची कामे पुर्ण होत नसल्याने सर्व औद्योगिक संघटनांनी नाराजी व्यक्त केली. याबाबत कार्यकारी अभियंता, म.औ.वि.म. विभाग, धुळे यांनी प्रस्तावाच्या मंजुरीसाठी पाठपुरावा करुन कामे लवकरात लवकर पुर्ण करावीत असे आदेश मा. अध्यक्ष यांनी दिले. | का.अ. मऔविम धुळे |
| २ | सध्या मऔविम मध्ये उपलब्ध असलेले भुखंड, .त्यांची मागणी व विहीत मुदतीत बांधकाम पुर्ण न केलेले भुखंड परत घेणे बाबत – खांदेश औ.विकास परिषद | भुखंडाचे पंचनामे करण्याची कार्यवाही सुरु असुन पंचनाम्या नंतर सदर भुखंड व्हॅकन्ट लिस्ट मध्ये टाकले जातील असे प्रा.अ. मऔविम यांनी सांगितले. श्री नितीन बंग मुप्र खांदेश औविप यांनी भुखंड धारकाचे नांव पत्ता व संपर्क क्रमांक, भुखंडांचा क्रमांक व क्षेत्रफळ, भुखंडाचा ताबा दिल्याची तारीख, बांधकाम परवानगी घेतली असल्यास त्याची तारीख, पाण्याची जोडणी घेतली असल्यास त्याची तारीख अशा प्रकारची माहिती मऔविम कडे मागीतलेली आहे. .त्याच फॉरमॅट मध्ये मऔविम क्षेत्रातील घटकांची माहिती इतर संघटनांनाही माहिती उपलब्ध करुन देणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. या बाबत प्रा.अ. मऔविम यांनी एप्रिलच्या पहिल्या आठवडयात सर्व औ. संघटनांच्या अडचणी सोडवण्यासाठी एका बैठकीचे आयोजन करणे बाबत सुचीत करण्यात आले. | प्रा.अ मऔविम धुळे |
| ३ | धुळे मऔविम क्षेत्रातील अतिक्रमण धारकांना भुखंड उपलब्ध करुन देणे बाबत - लघु उद्योग भारती | मऔविम क्षेत्रात विविध ठिकाणी एकुण २१ भुखंड निश्चीत झाले असुन ते ६० अतिक्रमण धारकांना वाटप करायचे आहे, या पुर्वी एक भुखंड दोघांत विभागुन ४२ अतिक्रमण धारकांचे पुनर्वसन करण्याचे ठरले होते, उर्वरीत १८ अतिक्रमण धारकांचे अतिक्रमण काढणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे सुधारीत प्रस्तावात सर्वांना समाविष्ठ करुन प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवला असल्याचे प्रा.अ. मऔविम यांनी सांगितले, या बाबत पाठपुरावा करुन भुखंडाचे वाटपाची कार्यवाही तात्काळ करुन पुन्हा अतिक्रमण होणार नाही, याची काळजी मऔविमने घ्यावी, असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | प्रा.अ मऔविम धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | धुळे मऔविम वसाहत क्षेत्रात नविन मुखंड उपलब्ध करणे बाबत - सर्व संघटना | मऔविम क्षेत्रा शेजारी रावेर गावाच्या परिसरातील ६०० हेक्टर भु-संपादन प्रस्ताव उपविभागीय कार्यालयाकडे प्रलंबीत असुन जमीनी ताब्यात घेण्यासाठी अनेक अडचणी येत असुन क्षेत्र ताब्यात घेण्यास खुप विलंब लागणार आहे. म्हणुन सध्या १०० हेक्टर क्षेत्रामध्ये शासनाची व खाजगी जमीन किती हे समजत नाही, शेतकरी फी भरण्यास तयार नसल्यामुळे मोजणी फी भरुन मोजणी करुन घ्यावी असे उपविभागीय अधिकारी यांनी सांगितले, यावर सविस्तर चर्चा होवुन मऔविमने मोजणी फी भरुन शासकीय जमीन सलग एका बाजुला व खाजगी जमीन सलग एका बाजुला अशा प्रकारे डिमार्केशन करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | प्रा.अ. मऔविम धुळे |
| ५ | मुंबई-आग्रा महामार्गावरील जकात नाक्यामुळे होत असलेल्या वाहतुकीच्या अडथळ्या बाबत - डामा धुळे | इतर शहरांप्रमाणे जकात नाका व वाहतुकीचे नियोजन करावे या बाबत लेखी पत्र देवुन अहवाल मागवावा असे ठरले होते. या बाबत वाहतुकीचे निश्चीत काय नियोजन केले ते उपस्थित प्रतिनिधींना सांगता आले नाही, सर्व औद्योगिक संघटनांच्या पदाधिका-यांनी एकत्रित आयुक्त मनपा यांचेशी प्रत्यक्ष चर्चा करुन नियोजन करावे असे मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | आयुक्त मनपा धुळे औ. सघटना |
| ६ | प्रदुषण न करणा-या घटकांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेणे पासुन सुट देण्यात यावी - सर्व संघटना | सभेस प्रदुषण मंडळाचे अधिकारी उपस्थित नसल्यामुळे नाराजी व्यक्त करण्यांत आली, सदर बाब धोरणात्मक असुन सदर विषय मा.निमंत्रक, राज्य उद्योग मित्र मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावा असे सर्वानुमते ठरले. | जिउकें धुळे |
| ७ | नरडाणा ग्रोथ सेंटर मध्ये नविन पाईपलाईन टाकुन पाणी उपलब्ध करुन देणे व अविकसीत मुखंड ताब्यात घेणे बाबत - मा. आमदार श्री.जयकुमार रावल | नरडाणा औद्योगिक क्षेत्रात फक्त २ घटकांनी उत्पादन सुरु केलेले आहे. राष्ट्रीय महामार्गाचे ४/६ पदरीकरणाचे काम प्रगतीपथावर असल्याने पुर्वी टाकण्यात आलेली सिमेंटची जलवाहीन्या काढाव्या लागणार आहेत व सदर काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे नरडाणा औद्योगिक क्षेत्रात पाणी पुरवठा करणेसाठी नविन जलवाहीन्या टाकण्याचे काम सुरु करण्यात आलेले असुन प्रगतीपथावर आहे. तसेच औद्योगिक क्षेत्रातील अंतरीम पाणी पुरवठा योजनेच्या कामाच्या निविदा काढण्यात आलेल्या होत्या. परंतु त्यास प्रतिसाद न मिळाल्याचे कार्यकारी अभियंता, म.औ.वि.म. विभाग, धुळे यांनी सांगितले. तसेच सदर क्षेत्रात साधारणत: २००८ साली भुखंड वाटप झालेले असुन त्यांना भुखंडाचा विकास करण्याची मुदत २०१३ असल्याने सध्या भुखंड परत घेण्याची कार्यवाही करता येत नसल्याचे प्रा.अ. मऔविम यांनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन नरडाणा ग्रोथ सेंटर मधील उद्योजकांना सर्व मुलभुत सुविधा मऔविम तात्काळ उपलबध करुन देण्याची कार्यवाही करावी असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | काअ मऔविम धुळे |
| ८ | अंध अपंग मतिमंद बेरोजगारांसाठी प्रशिक्षण व विशेष अर्थ सहाय्य देणे बाबत विचार व्हावा - | मागील सभेत ठरल्याप्रमाणे अंध, अपंग, मतिमंद बेरोजगारांना उद्योजकता विकास प्रशिक्षण देण्याचे दृष्टिने औद्योगिक संघटनांनी सविस्तर प्रस्ताव व लाभार्थ्यांची यादी अद्याप दिलेली नसल्याचे सदस्य सचिव यांनी सांगितले, तरी ती तात्काळ देणेत यावी असे औ.सघटनांना आवाहन करण्यांत आले. | औ.संघटना / जिउकें |
| ९ | नाशिक महसुल आयुक्तांचे अध्यक्षते खाली धुळे नंदुरबार जळगांव जिल्हयाची स्वतंत्र सभा आयोजना बाबत | मा उद्योग सह संचालक नाशिक विभाग यांचे मार्फत मा.विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडुन सभेची दिनांक व वेळ निश्चीत करणे बाबत प्रस्ताव सादर केला आहे. एका विभागात तिन जिल्हयाची स्वतंत्र सभा धोरणानुसार घेता येत नाही, म्हणुन पुढील सभेच्या अजेंडयात सर्व प्रथम धुळे नंदुरबार जळगांव जिल्हयांतील अडचणी प्रश्न घ्यावेत तद नंतर नाशिक अहमदनगर जिल्हयाचे प्रश्न घ्यावेत, म्हणजे या तीन ही | जिउकें धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | मऔविम क्षेत्रातील ईएसआय दवाखान्यात सुविधा मिळणे बाबत व ईएसआयचा फायदा घेतलेल्या समासदांसाठी शासकीय रुग्णालयात विशेष व्यवस्था होणे बाबत- खांदेश औद्योगिक विकास परिषद | मागील सभेत औद्योगिक संघटनांच्या अडचणी सोडवण्यासाठी ईएसआय अधिकारी व औद्योगिक संघटनांची बैठक आयोजीत करुन अडचणींचा अहवाल पुढील सभेपुर्वी सादर करणे बाबत सुचीत करण्यांत आले होते, ईएसआय धुळे यांनी काहीही कार्यवाही केली नसल्याचे औ.संघटनांचे पदाधिकारी यांनी सभेत सांगितले, ईएसआयने कार्यवाही केली नसल्याने मा.अध्यक्ष यांनी नाराजी व्यक्त केली. या बाबत पुणे येथील वरिष्ठ अधिका-यांनी धुळे येथे उद्योजकांच्या अडचणी सोडवण्यासाठी तात्काळ बैठकीचे आयोजन करणे बाबत मा.अध्यक्ष यांचे सहीने अ.शा.पत्राव्दारे कळविणे बाबत सुचीत करण्यांत आले. | जिउकें धुळे ईएसआय धुळे |
| ११<br><br><br>१२ | मे.किरण लॅब प्लास्ट, ए-३ उद्योगनगर सह संस्था – धटका समोरील अतिक्रमणा बाबत<br>ए-१० मुखंडावरील अतिक्रमण काढुन मुखंड हस्तांतरण करुन मिळणे बाबत - अध्यक्ष उद्योगनगर सह संस्था धुळे - | मागील सभेत दिनांक १२.०१.२०११ रोजी सदर भुखंडासमोरील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी, त्यासाठी जेसीबी, ट्रॅक्टर, मजुर इ. घटक उपलब्ध करुन देईल तर त्यासाठी खर्च मऔविमने करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले होते, मऔविम यांनी पोलीस संरक्षण मिळाले नसल्याची सबब सांगुन अतिक्रमण काढले नसल्याचे सांगितले, यावर मा.अध्यक्ष व सर्व सदस्यांनी नाराजी व्यक्त केली, काअ मऔविम यांनी स्वतः मा.पोलीस अधिक्षक यांचेशी चर्चा करुन कार्यवाही करणे अपेक्षीत असल्याचे मा.अध्यक्ष यांनी सांगितले, या बाबत मा.अध्यक्ष स्वतः दिनांक १०.०३.२०११ रोजी मा.पोलीस अधिक्षक यांना योग्य त्या सुचना देणार असल्याचे सुचीत केले.<br>तसेच ए-१० हा भुखंड उद्योगनगर सहकारी संस्थेला आवश्यक असल्यास देण्याबाबत तरतुदी तपासून कार्यवाही करण्यात यावी, असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | प्रा अ / का अ मऔविम धुळे |
| १३ | एमआयडीसी क्षेत्रात दर शनिवारी सकाळी ६ ते १० या वेळेत विजपुरवठा बंद असतो त्याऐवजी किमान दिवे सुरु ठेवता येतील अशी व्यवस्था होणे बाबत - श्री नितीन बंग मुख्य प्रवर्तक खांदेश औ.विकास परिषद धुळे | एमआयडीसी क्षेत्रात दर शनिवारी सकाळी ६ ते १० या वेळेत विजपुरवठा बंद असतो त्याऐवजी सध्या किमान दिवे सुरु ठेवता येतील अशी व्यवस्था महावितरण केलेली असल्यामुळे सदरचा विषय वगळण्यांत यावा असे ठरले. | अ.अ. महावितरण कं धुळे |
| २ | मे गंगेश्वर हॅचरीज अँड ब्रिडींग फार्म प्रा.लि. मोराणे प्र.नेर यांना विजपुरवठा औद्योगिक नियमाप्रमाणे मिळणे बाबत | या बाबत घटकाच्या दिनांक ०१.०३.२०११ च्या पत्राची प्रत पुढील कार्यवाहीसाठी अ.अ. महावितरण धुळे यांना पाठविण्यांत आलेली असुन उपस्थित प्रतिनिधींना सभागृहात सविस्तर अनुपालन सादर करता न आल्याने उपस्थितांनी नाराजी व्यक्त केली. या बाबत अ.अ.महावितरण यांचेशी मा.अध्यक्ष यांची चर्चा झालेली असुन सविस्तर चर्चा करणेसाठी अधिक्षक अभियंता महावितरण यांनी दिनांक १०.०३.२०११ रोजी मा.अध्यक्ष यांना प्रत्यक्ष भेटुन अनुपालन सादर करणे बाबत सुचीत करण्यांत आले. | अ.अ. महावितरण धुळे |
| ३ | आयत्या वेळच्या विषयावर चर्चा करणे | | |
| १ | मऔविम क्षेत्रातील विजबिले वेळेवर मिळणे बाबत - सर्व संघटना | सध्या महावितरण कंपनी खाजगी लोकांकडुन विज बिल वितरणाचे काम करत असुन सदर बिले वेळेवर उद्योजकांना मिळत नसल्यामुळे उशिरामुळे नाहक दंड भरावा लागत असल्याचे संघटनाचे प्रतिनिधींनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन महावितरण कंपनीने ग्राहकांना विजबीले वेळेवर देण्याची व्यवस्था करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | अअ महावितरण |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | मे.समता किचन एमआयडीसी धुळे या घटकाच्या मुखंड मुदतवाढी बाबत एमआयडीसीकडुन होत असलेल्या त्रासा बाबत- श्री देवेंद्र राजपुत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | श्री मनोज बोरसे यांनी सांगितले की, त्यांच्या २००७ साली घेतलेल्या भुखंडाच्या मुदतवाढीसाठी प्रयत्न करीत असुन त्रिसदस्यीय करारनामा होण्यासाठी मऔविम कडून आर्थिक पिळवणुक होत असुन पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजने अंतर्गत बँकेने मंजुर केलेल्या प्रकरणात वितरण झालेले नाही. मऔविमच्य कारभाराबाबत सर्व संघटनांनी नाराजी व्यक्त केली. या बाबत प्रा.अ. मऔविम यांनी सांगितले की, सदर घटकाचा प्रस्ताव या पुर्वीच दि. ११/०१/२०११ रोजी मंजुरीसाठी मुंबई कार्यालयास सादर केला आहे. या बाबत सविस्तर चर्चा होऊन प्रा.अ. मऔविम यांनी मुंबई कार्यालयाकडे पाठपुरावा करावा असे सुचीत केले. | मऔविम मुंबई धुळे |
| ३ | मे.मयुरेश प्लास्टिक - ओटीएस योजने अंतर्गत सवलती मिळणे बाबत - श्री देवेंद्र राजपुत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | मयुरेश प्लास्टिक या घटकास ओटीएस योजने अंतर्गत सवलती देणे बाबत सध्यस्थितीत ओटीएस योजना सुरु नसल्याने शासनाने ओटीएस योजना सुरु केल्यास त्याचा फायदा सर्व घटकांना होईल. | जिउकें धुळे |
| ४ | मे.ओमशांती ग्रुप साठी एक्सप्रेस फिडर वरुन मिळत असलेला विज पुरवठा पुर्ण दावाने व नियमीत होणे बाबत श्री देवेंद्र राजपुत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | श्री राजेश वाणी अध्यक्ष लघु उद्योग भारती यानी सांगितले की, ओमशांती ग्रुपसाठी त्यांनी २५.०० लक्ष रुपये भरुन स्वतंत्र फिडर घेतले असतांना सुध्दा २४ विज नियमीत मिळत नाही, त्यामुळे उत्पादन क्षमतेवर, कामगारांना अतिरिक्त पगार द्यावा लागते, तसेच कमी व्होल्टेज मुळे इलेकक्ट्रीक उपकरणे नादुरुस्त होतात, तरी महावितरण कंपनीने २४ तास विज पुर्ण क्षमतेने उपलब्ध करुन देण्याची मागणी केलेली आहे. या बाबत सविस्तर चर्चा होवुन दिनांक १०.०३.२०११ रोजी अ.अ. महावितरण यांनी मा.अध्यक्ष यांचे प्रत्यक्ष चर्चा करणे बाबत सुचीत करण्यांत आले. | अ.अ. महावितरण कं |
| ५ | मऔविम क्षेत्रातील प्रदुषीत पाणी निचरा मऔविमच्या तलावात होत असुन तो सर्वांच्या आरोग्यास घोकादायक आहे - श्री देवेंद्र राजपुत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | सांडपाणी व प्रदुषित पाणी हे महामंडळाच्या तलावात जात असते. त्यामुळे क्षेत्रातील उद्योजकांच्या व कामगारांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे श्री देवेन्द्र राजपुत, अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव, यांनी सभागृहात सांगितले. याबाबत कार्यकारी अभियंता, म.औ.वि.म. विभाग, धुळे यांनी सांगितले की, संबंधीत घटकास याबाबत कळविण्यात आलेले असुन त्या पत्राची प्रत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास पुढील कार्यवाहीसाठी देण्यात आलेली आहे. | काअ मऔविम धुळे |
| ६ | ई सेक्टर मधील ॲमेनिटी भुखंडावर उद्योग सुरु करणे बाबत - श्री देवेंद्र राजपुत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | ई सेक्टर मध्ये ॲमेनीटी साठी राखीव भुखंड उत्पादनासाठी ४ घटकांना दिलेले असुन त्यापैकी एक घटकाचे उत्पादन सुरु झालेले आहे, इतर ३ घटकांनी अद्याप उत्पादन सुरु केलेले नसल्याचे लघु उद्योग भारती संघटनेच्या पदाधिका-यांनी यांनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन मऔविम क्षेत्रातील ॲमेनीटी भुखंडावर लवकरांत लवकर उत्पादन सुरु होण्यासाठी मऔविमने पाठपुरावा करुन अहवाल सादर करणे बाबत म.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | प्रा अ मऔविम |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | श्री प्रकाश जोशी, मे.प्रकाश इंडस्ट्रीज यांच्या दोन भुखंड एकत्रीकरण करण्यास मऔविम कडुन व पोलीस खात्याकडुन होत असलेल्या त्रासा बाबत- श्री देवेंद्र राजपुत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | या बाबत प्रा.अ.मऔविम यांनी सांगितले की, सदर अर्जदाराचा दोन भुखंड एकत्रीकरण करण्याचा प्रस्ताव २००८ मध्ये तत्कालिन अधिका-यांनी नामंजुर केला असुन सध्यस्थितीत कोणतेही काम प्रलंबीत नसल्याचे सांगितले. त्यानंतर श्री जोशी यांनी सांगितले की, बांधकाम आराखडा मंजुरीसाठी आर्थिकदृष्टया खूप पिळवणूक मऔविमच्या अधिका-यांनी केली असून माहितीच्या अधिकारात माहिती मागवल्याचा राग येवुन मऔविमने पोलीसात तक्रार केली असून पोलीसांकडुन मानसीक व आर्थिक छळणूक होत आहे. या बाबत पोलीस स्टेशनला एफआयआर अथवा तक्रार सुध्दा दाखल केली नसल्याचे मऔविमचे वतीने प्रा.अ., मऔविम धुळे यांनी सांगितले. तसेच ही बाब इतिवृत्तात घेण्याविषयी प्रा.अ., मऔविम धुळे यांनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन सदर बाब दिनांक १०.०३.२०११ रोजी मा.अध्यक्ष स्वतः मा.पोलीस अधिक्षक यांचेशी चर्चा करणार असुन त्यावेळी श्री जोशी यांनी उपस्थित राहणे बाबत सुचीत करण्यांत आले. तसेच आर्थिकदृष्टया उद्योजकांची जर पिळवणूक होत असल्यास त्यांनी लाचलुचपत विभागाकडे तक्रारी नोंदवणे बाबत सर्व उद्योजकांना आवाहन केले. | प्रा.अ मऔविम |
| ८ | लघु उद्योग घटकांना विज बिल हप्त्या हप्त्याने भरणेस सवलत मिळणे बाबत - श्री देवेंद्र राजपुत, शहर अध्यक्ष, श्री राजेश वाणी, अध्यक्ष, श्री भरत अग्रवाल, सचिव लघु उद्योग भारती धुळे | लघु उद्योग घटकांना मिळालेले विज बिल एकदम भरणे शक्य नसल्याने ते हप्त्या हप्त्याने भरणेस सवलत मिळावी अशी औ. संघटनांची मागणी असल्याचे सदस्य सचिव यांनी सांगितले. या वर सविस्तर चर्चा होवुन अ.अ. महावितरण यांनी दिनांक १०.०३.२०११ रोजी मा.अध्यक्षांकडे चर्चेसाठी उपस्थित राहणे बाबत सुचीत करण्यांत आले. | अ.अ. महावितरण कं |

उपस्थित औद्योगिक संघटनांनी व उद्योजकांनी मऔविम आर्थिक पिळवुकीबाबत व कामकाजा बाबत सभेत शेवटी निषेध व्यक्त केला.

शेवटी मा.अध्यक्ष यांचे परवानगी सर्व उपस्थितांचे आभार सदस्य सचिव यांनी मानुन सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले.

सही/-
सदस्य सचिव
तथा महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र धुळे

सही/-
मा.अध्यक्ष तथा
जिल्हाधिकारी धुळे